मंगळवार
२८
जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १८१
पाने - ६
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25





गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, प्रतिथयश उद्योजक टी.बी.जी. ग्रुपचे संचालक माननीय

# इंजि. तुषारभाऊ गिते

यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

TBG
GROUP MAHARASHTRA

- Civil works
- Construction
- Road Development
- Public Infrastructure
- Building Projects.
- Bridges
- Dams

कारभारी दादा शिवार प्रतिष्ठान
सोनोशी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

Er. Tushar Gite, Er. Balasaheb Gite

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
आधुनिक उपचार पद्धती
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क अँड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# कारगिल विजय दिनानिमित्त वीरमाता व वीरपत्नींचा गौरव

## सैनिक स्मारकासाठी ४२ गुंठे जागा, उभारणीसाठी २० लाखांच्या निधीची घोषणा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कारगिल विजय दिनानिमित्त स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेच्या वतीने मालपाणी लॉन्स येथे वीरमाता, वीरपत्नी आणि समाजभूषण पुरस्कार वितरणाचा भव्य सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी देशासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. तसेच संगमनेरमध्ये उभारण्यात येणाऱ्या सैनिक स्मारकासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ४२ गुंठे जागा देण्यात येणार असल्याची घोषणा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. तर स्मारक उभारणीसाठी सुरुवातीला २० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा आमदार अमोल खताळ यांनी केली.

### समाजभूषण हरिभाऊ उगले यांचा सन्मान वीरमाता व वीरपत्नींचा गौरव

**डोंगरगाव येथील समाजसेवक हरिभाऊ उगले यांना संत गाडगेबाबांच्या विचारांनी प्रेरित होऊन स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन व विविध सामाजिक उपक्रमांतील उल्लेखनीय कार्याबद्दल 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. तसेच वीरपत्नी वैशाली बडे, वर्षा घोडेकर, सुरेखा पवार, मनीषा गुंजाळ, मंगल वलटे, सिंधुताई मनसुख तसेच वीरमाता लहानुबाई ढगे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.**

### व्हिक्टोरिया क्रॉस विजेते नामदेवराव जाधव यांच्या स्मारकासाठी ४२ गुंठे जागा

**व्हिक्टोरिया क्रॉस विजेते नामदेवराव जाधव यांचे संगमनेरमध्ये भव्य स्मारक उभारण्यासाठी स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेने सातत्याने पाठपुरावा केला आहे. या स्मारकासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वेल्हाळे परिसरातील ४२ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा बाळासाहेब थोरात यांनी केली. राज्यातील आदर्श सैनिक स्मारक म्हणून हे स्मारक उभे राहावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.**

### स्मारकासाठी २० लाखांच्या निधीची आमदार अमोल खताळ यांची घोषणा

**मी केवळ बोलणारा नाही, तर कृतीतून काम करणारा आहे. सैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी आहे. सैनिक स्मारकासाठी जागेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर स्मारक उभारणीसाठी माझ्याकडून २० लाख रुपयांच्या निधीची सुरुवात करण्यात येईल, अशी घोषणा आमदार अमोल खताळ यांनी केली. कारगिल युद्धात ५२७ जवानांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या त्यागामुळेच देश सुरक्षित असून प्रत्येक भारतीयाने राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेब थोरात होते. यावेळी आमदार अमोल खताळ, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, रामहरी कातोरे, मेजर भाऊसाहेब पोखरकर, तालुकाध्यक्ष प्रकाश कोटकर, कॅप्टन सुभाष कुडेकर, सुनील थोरात, प्रा. बाबा खरात, संपादक किसनभाऊ हासे, जितेश लोढा, युवराज गांजवे, सौ. रोहिणी कोटकर यांच्यासह स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, कारगिल विजय हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा सुवर्ण अध्याय आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, डोंगराळ भागात पाकिस्तानच्या सैन्याचा पराभव करून भारतीय जवानांनी (पान ३ वर)

# शिवनाथ आयुर्वेदचा परवाना कायमचा रद्द

## एफडीएची धडक कारवाई, अंनिसला यश, गडगेला झटका



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भोंदूगिरी आणि बेकायदेशीर औषध निर्मितीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई करत सिन्नर तालुक्यातील जायगाव येथील शिवनाथ आयुर्वेदिक प्रॉडक्ट कंपनीचा औषधनिर्मिती परवाना कायमस्वरूपी रद्द केला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव ड. रंजना पगार-गवांदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

डॉ. मोहन पुरी हा वडगाव पान येथील बहुचर्चित राजेंद्र गडगे प्रकरणातील सहआरोपी असून सध्या तो जामिनावर असल्याची माहिती आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान संशयास्पद औषधनिर्मितीबाबत ड. पगार-गवांदे यांनी एफडीएकडे तक्रार केली होती.

तक्रारीनंतर एफडीएच्या नाशिक पथकाने कंपनीची तपासणी केली असता औषधनिर्मितीचे आवश्यक निकष पाळले जात नसल्याचे, उत्पादन प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचे आणि औषधे व सौंदर्यप्रसाधने कायद्यातील अनेक नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले. कारणे दाखवा नोटीस व सुनावणीनंतर ३० जून २०२६ रोजी परवाना कायमचा रद्द करण्याचा अंतिम आदेश देण्यात आला.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, डॉ. मोहन पुरी हा राजेंद्र गडगेचा निकटवर्तीय असून विविध भोंदू बाबांना कथित आयुर्वेदिक औषधांचा पुरवठा करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे संबंधित प्रकरणाच्या तपासाला आणखी बळ मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पुराचा हाहाकार! आसाममध्ये ६८ जणांचा मृत्यू



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आसाममध्ये पुरामुळे प्रचंड हाहाकार पाहायला मिळत आहे. पुरामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या वाढून आता ६८ वर पोहोचली आहे. पाच जिल्ह्यांतील ५.२४ लाखांहून अधिक नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, चराईदेव, गोलाघाट, जोरहाट, नागाव आणि शिवसागर या जिल्ह्यांमध्ये ५,२४,७०० हून अधिक नागरिक बाधित झाले आहेत. गेल्या २४ तासांत चराईदेव जिल्ह्यात पाण्यात बुडून दोन जणांचा मृत्यू झाला, ज्यामुळे एकूण मृतांचा आकडा वाढला आहे.चराईदेव जिल्ह्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला असून तेथील १.९ लाख नागरिक बाधित झाले आहेत. याशिवाय शिवसागरमध्ये १.५ लाखांपेक्षा जास्त, तर जोरहाटमध्ये १.४ लाख नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. याच दरम्यान शनिवारी ६ जिल्ह्यांमधील जवळपास ६.५५ लाख लोक बाधित झाले होते, त्या तुलनेत आता परिस्थितीमध्ये काही प्रमाणात सुधारणा दिसून येत आहे. प्रशासन सध्या चार जिल्ह्यांमध्ये ३५४ मदत छावण्या आणि मदत वाटप केंद्र चालवत असून यामध्ये ३७,७२४ बेघर नागरिकांना निवारा देण्यात आला आहे. कावेरी नदीत बाप-लेकासह ९ जण गेले वाहून, आसामच्या विविध भागांमध्ये भारतीय सैन्य, एनडीआरएफ, एसडीआरएफ अग्निशमन व आपत्कालीन सेवा आणि पोलिसांकडून बचावकार्य वेगाने सुरू आहे. सध्या राज्यातील ७६३ गावं पुराच्या पाण्याखाली गेली आहेत, तर ४८,७४२.०९ हेक्टरहून अधिक शेतजमिनीचं नुकसान झालं आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये रस्ते, पूल आणि इतर सार्वजनिक पायाभूत सुविधांचे मोठं नुकसान झाले.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॉमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# विद्यार्थ्यांच्या यशस्वी लढ्याचे काँग्रेससह समविचारी पक्षांकडून स्वागत



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - दिल्ली येथे जंतर - मंतर वर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात लाठी हल्ला झाला. विद्यार्थ्यांवर अमानुष अत्याचार झाले. यानंतर या आंदोलनाला मोठ्या संघर्षातून यश मिळाले असून विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संगमनेर मध्ये काँग्रेस सह सर्व समविचारी पक्षांनी स्वागत केले असून केंद्रातील गर्विष्ठ सरकारला जाब विचारण्यासाठी देशातील तरुणाई सज्ज झाली असल्याचे संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.

संगमनेर बस स्थानक येथे संगमनेर शहर व तालुका युवक काँग्रेस, छात्र भारती, शिवसेना, अंधश्रद्धा निर्मूलन, सत्यशोधक समाज, दलित पँथर, शेतकरी संघटना, एनएसयुआय, महिला संघटना व सर्व पुरोगामी संघटना व विद्यार्थी संघटनांच्या वतीने या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा बद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, मागील २८ दिवसांपासून दिल्ली येथे जंतर - मंतरवर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. मात्र या आंदोलनाकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केले आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. २० जुलै रोजी विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठी हल्ला केला. अनेक युवक व युवती जखमी झाल्या याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. शिक्षण व्यवस्थेत मोठा भ्रष्टाचार असून शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा पहिला हवा होता. केंद्र सरकारला खूप उशिरा जाग आली मात्र तरुणाई पुढे केंद्र सरकारला माघार घ्यावी लागली असून हा राजीनामा झाला अजूनही अनेक प्रश्न बाकी आहेत यासाठी लढाई करावी लागणार आहे.

गर्विष्ठ झालेल्या केंद्रातील सरकारला जाब विचारण्यासाठी तरुणाई आता सज्ज झाली असून देशातील राज्यघटना लोकशाही टिकवण्यासाठी आता तरुणांनी संघटितपणे एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

तर सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, हे विद्यार्थी कोणत्या पक्षाचे नव्हते ते देशाचे भवितव्य होते.मात्र सरकारने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले अमानुषपणे त्यांच्यावर हल्ला केला. अनेक मुलींचा छळ झाला. भर पावसामध्ये हे मुलं रस्त्यावर झोपत होते. अतोनात हाल त्यांचे झाले. ब्रिटिश सुद्धा असे वागत नव्हते इतके क्रूरपणे केंद्र सरकार वागले आहे. मात्र तरुणांनी त्यांना त्यांची जागा आता दाखवली आहे तरुणांनी अशीच देशासाठी एकजूट ठेवावी असे त्यांनी म्हटले.

यावेळी शिवसेनेचे अमर कतारी, ॲड. रंजना गवांदे, तुषार पानसरे, शेखर सोसे यांनीही केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. यावेळी विविध पक्षांचे कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**केंद्र सरकारचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा उशिरा झाला मात्र सरकारला तरुणाईने नमवले या आनंदोत्सवात संगमनेर वरील युवकांनी फटाक्यांची आतिषबाजी करत उत्साह साजरा केला याचबरोबर यापुढील काळात लोकशाही व राज्यघटना वाचवण्यासाठी आम्ही एकत्रितपणे लढू असे म्हणून झेन जी जिंदाबाद च्या घोषणा दिल्या.**

# आमदार लहामटे यांनी नुकसानीची केली पाहणी

## भूस्खलनग्रस्त कुटुंबाला आमदार लहामटेंची तातडीची मदत



युवावार्ता(प्रतिनिधी) -

अकोले - तालुक्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरु असणाऱ्या मुसळधार पावसाने अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. पांजरे येथील शेतकऱ्याचे घर भूस्खलनात सापडले होते, त्यास आमदार लहामटे यांनी सरकारी यंत्रणेच्या समन्वयातून मदत केली आणि शनिवारी (दि. २५) प्रत्यक्ष भेट दिली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, शुक्रवारी (दि. २५) झालेल्या मुसळधार पावसामुळे पांजरे येथील गडदुआई परिसरातील हरी शांताराम उघडे यांचे घर भूस्खलनात सापडले होते. या घटनेची माहिती मिळताच आमदार डॉ. किरण लहामटे, कार्यकर्ते व सरकारी यंत्रणेच्या समन्वयातून संपूर्ण कुटुंबाला तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. तसेच त्यांना आवश्यक दरम्या, जीवनावश्यक साहित्य व देण्यात आली. तातडीची मदत उपलब्ध करून शनिवारी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन आमदार लहामटे यांनी परिस्थितीची पाहणी केली. उघडे कुटुंबियांची विचारपूस करत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामा करून शासनाकडून सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. संकटाच्या या काळात प्रशासन आणि आम्ही सर्वजण बाधित कुटुंबाच्या पाठिशी ठामपणे उभे आहोत असा आधार त्यांनी दिला.


**ग्रामपंचायत ढोरसडे-अंत्रे, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर**

**सन २०२५ –२६ जाहिर निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना १**

सरपंच ग्रामपंचायत ढोरसडे–अंत्रे, ता. शेवगाव जि. अ. नगर योग्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागविन्यात येत आहे. निविदा कोरा नमूना संच वाटप व भरलेली निविदा स्विकारण्याचा कालावधी दि. २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. ०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत

| अ. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम रु. | बयाना रक्कम | काम पुर्ण करण्याची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत | ठेकेदाराचा वर्ग | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे ढोरसडे–अंत्रे बंदिस्त गटार करणे | २१५३९२/- | २१५३/- | ६ महिने | २३६/- | मजूर सहकारी संस्था | १५ वा वित्त आयोग योजना सन २०२३–२४/ २०२५–२६ |
| २. | १) मौजे ढोरसडे–अंत्रे येथे जि.प. शाळा डीजीटल करणे, (७०४९८) २) मौजे ढोरसडे–अंत्रे येथे बालअंगणवाडी करणे (२८३९४) | ९९३४२/- | ९९३/- | ६ महिने | २३६/- | खुला | १५ वा वित्त आयोग योजना सन २०२५–२६ |

१. उपरोक्त विषयान्वये निविदा अटी व शर्त इ. बाबत सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असुन कोऱ्या निविदा संच दि. २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. ०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय ढोरसडे–अंत्रे येथे पहावयास मिळेल. २. बयाना रक्कम ही धनाकर्ष सरपंच ग्रामपंचायत ढोरसडे–अंत्रे यांच्या नावाने असणे अभिप्रेत आहे. ३. उपरोक्त कामाची दि. २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि ०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल ४. निविदा दि. ०५/०८/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ग्रामपंचायत कार्यालय ढोरसडे–अंत्रे येथे उघडण्यात येतील. ५. निविदा या बयाना लिफाफा, तांत्रिक लिफाफा या पद्धतीच्या सादर करावयाच्या आहेत. ६. निविदा अटी व शर्तिमध्ये बदल करणे, प्राप्त निविंदापैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारन्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी राखून ठेवलेला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत ढोरसडे–अंत्रे, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर**


# गंगा सृष्टी येथे आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील गंगा सृष्टीमध्ये गंगा सृष्टी सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आषाढी एकादशीचा पवित्र सोहळा यंदा सलग नवव्या वर्षी भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला असून नागरिकांनी या सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आषाढी एकादशी निमित्त हरिनामाच्या गजरात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यानंतर महाआरती, विविध गुणदर्शन कार्यक्रम, फुगडी तसेच सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे विठ्ठलभक्तीचा अनोखा उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बालगोपाळ, महिला आणि गंगा सृष्टी परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

या उपक्रमामागील मुख्य उद्देश आपल्या संस्कृती, परंपरा आणि वारकरी संप्रदायाची मूल्ये नवीन पिढीपर्यंत पोहोचविणे, तसेच लहान मुलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. त्यामुळे धार्मिकतेबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवा रुजविण्याचाही प्रयत्न या सोहळ्यातून करण्यात आला. कार्यक्रमास गंगा सृष्टीचे ज्येष्ठ संचालक सुभाष गुंजाळ, संचालक विशाल गुंजाळ व प्रशांत गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच ज्ञानेश्वर गायकर, अमोल गवांदे आणि शिरीष म्हेत्रे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या सोहळयाच्या यशस्वी आयोजनासाठी शुभांगी गुंजाळ, रीना गुंजाळ तसेच गंगा सृष्टीच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. गंगा सृष्टीतील सर्व रहिवाशांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. भक्ती, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा आषाढी एकादशी सोहळा उपस्थितांच्या मनात कायमस्वरूपी स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# एसआयआर मॅपिंगमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा - अमृता कोळपकर



युवावार्त (प्रतिनिधी)

संगमनेर- एसआयआर मॅपिंग प्रक्रियेमध्ये प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन साई सिद्धी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अमृता अनिल कोळपकर यांनी केले आहे. नागरिकांच्या सहभागातूनच ही प्रक्रिया अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी सांगितले की, एसआयआर मॅपिंग ही महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक नागरिकाने ती वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

आपल्या नोंदविण्याबरोबरच कुटुंबीयांना, नातेवाईकांना, शेजाऱ्यांना आणि परिचितांनाही या प्रक्रियेची माहिती देऊन त्यांनाही सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

लोकसहभाग वाढल्यास ही प्रक्रिया अधिक पारदर्शक, अचूक आणि परिणामकारक होईल. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संबंधित यंत्रणांना सहकार्य करावे आणि आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आपला सहभाग म्हणजे सुजाण आणि जबाबदार नागरिकत्वाची ओळख आहे. प्रत्येकाने पुढाकार घेत एसआयआर मॅपिंग यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन अमृता अनिल कोळपकर यांनी केले आहे.

एसआयआर मॅपिंगमध्ये करण्यासाठी शंभर टक्के नागरिकांचा सहभाग सुनिश्चित सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

# संगमनेरमध्ये वाढत्या गुन्हेगारीवर कठोर कारवाईची भाजपची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात वाढती गुन्हेगारी, वाहतूक कोंडी, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, शाळा-महाविद्यालय परिसरातील टवाळखोरांचा वावर तसेच गुटखा, मटका, जुगार यांसारख्या अवैध धंद्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली.

निवेदनात शहर पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी व कंट्रोल रूम कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने प्रभावी गस्त, वाहतूक नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यात अडचणी येत असल्याचे नमूद करण्यात आले. बसस्थानक, बाजारपेठ, रुग्णालय परिसर तसेच मुख्य चौकांमध्ये वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमण वाढल्याचेही सांगण्यात आले.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी महिला पोलीस गस्त वाढविणे, शाळा-महाविद्यालय परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविणे, गुटखा विक्रेत्यांवर उजढझ- कायद्यानुसार कारवाई करणे, मटका-जुगार अड्ड्यांवर विशेष मोहीम राबविणे आणि नागरिकांसाठी स्वतंत्र तक्रार हेल्पलाईन सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच काही महिन्यांपूर्वी वडगावपान येथे अल्पवयीन मुलीवर झालेल्या सिड हल्ल्याचा तपास लवकर पूर्ण करून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचीही मागणी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष सौ. पायल ताजने, महिला शहराध्यक्ष सौ. ज्योतीताई भोर, शुभम लहामगे, साहेबराव वलवे, दिलीप रावल, आशिष ताजने, अरुण कुलकर्णी, शिवकुमार भंगीरे, पांडुरंग शेराल, मनोज जुन्दरे, प्रवीण करपे, कृष्णा डबीर, वैभव उनवणे, भाऊ जाखडी, अमित गुप्ता, संतोष पठाडे, सागर काळे, संदीप वैद्य, पवन काळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





आज पोलिस तक्रार दिना निमित्त संगमनेर प्रवासी सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे साहेब यांची भेट घेऊन बस स्थानकांमध्ये पोलिस चौकी सुरू करण्यात यावी त्याच बरोबर विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी वाघचौरे साहेब यांनी लवकरच पोलिस चौकी चालू करण्यात येईल असे सांगितले यावेळी संगमनेर प्रवासी सेवा संस्थेचे अध्यक्ष अनिल भोसले, संजय क्षत्रिय, कारभारी देव्हारे, मुरताज बोहरी,नितीन मोहाले,दिलीप गायकवाड, चंद्रकांत, आदी उपस्थित होते.

# पान २ वरून - कारगिल विजय दिनानिमित्त वीरमाता ...


देशाचा तिरंगा अभिमानाने फडकविला. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी जवान ऊन, वारा, पाऊस आणि कडाक्याच्या थंडीत अहोरात्र कर्तव्य बजावत असल्यामुळेच देशातील नागरिक सुरक्षित जीवन जगत आहेत. सैनिकांचे त्याग आणि बलिदान देशवासीयांसाठी कायम प्रेरणादायी राहतील, असे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यपूर्व काळातील पहिले व दुसरे महायुद्ध तसेच स्वातंत्र्यानंतर पाकिस्तान आणि चीन विरुद्धच्या युद्धांमध्ये भारतीय सैनिकांनी दाखविलेल्या शौर्याची आठवण करून देत त्यांनी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आ. अमोल खताळ म्हणाले की, स्वराज्य सैनिक कल्याण संस्था केवळ माजी सैनिकांपुरती मर्यादित न राहता समाजसेवेचेही मोलाचे कार्य करीत आहे. देशसेवेची भावना सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी जपली आहे. उणे १० ते १५ अंश तापमानात भारतीय जवान देशाच्या सीमा सुरक्षित ठेवतात.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी भारतीय सैन्याने देशाची एकात्मता आणि अखंडता टिकविण्यात बजावलेल्या भूमिकेचे कौतुक केले. सैनिकांप्रती आदर व्यक्त करणे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मेजर भानुदास पोखरकर, प्रा. बाबा खरात आणि कॅप्टन सुभाष कुडेकर यांनीही मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष प्रकाश कोटकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र जोशी यांनी तर आभार सुनील थोरात यांनी मानले. कार्यक्रमास तालुक्यातील माजी सैनिक, त्यांच्या कुटुंबीयांसह नागरिक, महिला व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय...

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुण्यतिथी निमित्ताने
## स्वप्नांना पंख देणारा महान राष्ट्रपुरुष



भारताच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी आपल्या कार्याने केवळ देशाची प्रगती घडवून आणली नाही, तर कोट्यवधी भारतीयांच्या मनात स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची जिद्द निर्माण केली. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक. २७ जुलै २०१५ रोजी शिलाँग येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करताना त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला असलेली गरज प्रकर्षाने जाणवते. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे जन्मलेल्या कलाम यांचे बालपण अत्यंत साध्या परिस्थितीत गेले. आर्थिक अडचणी असूनही शिक्षणाची ओढ आणि काहीतरी वेगळे करण्याची जिद्द त्यांच्या मनात कायम होती. त्यांनी भौतिकशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर एरोस्पेस अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी भारताच्या अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये योगदान दिले. भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि संरक्षण संशोधन व विकास संस्थेत कार्यरत असताना डॉ. कलाम यांनी देशाच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाला मोठी दिशा दिली. 'पृथ्वी', 'अग्नी' यांसारख्या क्षेपणास्त्र प्रकल्पांच्या विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या योगदानामुळे भारताची संरक्षण क्षमता बळकट झाली. याच कार्यामुळे त्यांना 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' ही ओळख मिळाली. १९९८ मधील पोखरण अणुचाचण्यांच्या काळातही डॉ. कलाम यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताला स्वावलंबी, सामर्थ्यवान आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यांच्या वैज्ञानिक योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना १९९७ मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान केला.

२००२ मध्ये डॉ. कलाम भारताचे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपती भवनातील सर्वोच्च पदावर विराजमान झाल्यानंतरही त्यांचा साधेपणा, नम्रता आणि विद्यार्थ्यांशी असलेला जिव्हाळा कायम राहिला. त्यामुळे ते केवळ 'राष्ट्रपती' न राहता देशातील विद्यार्थी आणि तरुणांचे 'लोकप्रिय राष्ट्रपती' बनले. राष्ट्रपतीपदाचा कार्यकाळ संपल्यानंतरही त्यांनी देशभरातील शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे कार्य सुरू ठेवले. डॉ. कलाम यांचा तरुणांवर विशेष विश्वास होता. भारताचे भविष्य हे देशातील युवकांच्या विचारांवर, ज्ञानावर आणि कृतीवर अवलंबून आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'स्वप्न पाहा, स्वप्न विचारात बदला आणि विचार कृतीत आणा' हा त्यांच्या जीवनाचा संदेश होता. त्यांच्या "Wings of Fire', "Ignited Minds' आणि "India २०२०' यांसारख्या पुस्तकांनी लाखो विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. आजच्या काळात डॉ. कलाम यांच्या विचारांचे महत्त्व अधिक वाढले आहे. स्पर्धेच्या वाढत्या दबावामुळे विद्यार्थी आणि तरुणांमध्ये तणाव, नैराश्य आणि भविष्याबद्दलची चिंता वाढताना दिसते. अशा परिस्थितीत अपयशाला घाबरू नका, प्रयत्न करत राहा आणि स्वतःमधील सामर्थ्य ओळखा, हा कलाम यांचा संदेश प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. डॉ. कलाम यांच्यासाठी राष्ट्रनिर्मिती ही केवळ सरकारची जबाबदारी नव्हती. प्रत्येक नागरिक, विशेषतः प्रत्येक विद्यार्थी, देशाच्या विकासात योगदान देऊ शकतो, असे ते मानत. विज्ञान, शिक्षण, संशोधन, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांच्या माध्यमातून भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे त्यांचे स्वप्न होते. २७ जुलै २०१५ रोजी विद्यार्थ्यांशी संवाद साधतानाच त्यांची जीवनज्योत मालवली. शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारा हा महान शिक्षक आज आपल्यात नसला तरी त्यांचे विचार आजही जिवंत आहेत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून थांबणे पुरेसे नाही; तर त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. डॉ. कलाम यांचे जीवन आपल्याला एकच गोष्ट शिकवते-परिस्थिती कितीही कठीण असली तरी मोठे स्वप्न पाहण्याची हिंमत सोडू नका. कारण मोठी स्वप्नेच मोठ्या राष्ट्रांची निर्मिती करतात.

# एकादशी निमित्त कोल्हेवाडीच्या मियावाकी जंगलात विठ्ठल-रुक्मिणी पूजन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने संगमनेर तालुक्यातील कोल्हेवाडी येथे डॉर्फ केटल जंगल कपस्पर्धे अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या मियावाकी जंगलामध्ये विठ्ठल-रुक्मिणी पूजनाचा भक्तिमय सोहळा उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात मियावाकी जंगलामध्ये विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना व विधिवत पूजनाने झाली. त्यानंतर विठ्ठलाचे अभंग, भजन आणि गौळणी सादर करण्यात आल्या. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थितांनी निसर्ग हीच खरी ईश्वरसेवा या भावनेने वृक्षसंवर्धन व पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेतली.

यावेळी वक्त् यांनी वृक्षलागवड ही केवळ पर्यावरण संवर्धनाची बाब नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध निसर्ग निर्माण करण्याची जबाबदारी असल्याचे सांगितले. मियावाकी जंगलासारखे उपक्रम जैवविविधता वाढविण्यासोबतच गावाच्या पर्यावरणीय विकासातही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# वाढदिवसाच्या खर्चाला फाटा देत निराधार मुलांना शैक्षणिक साहित्याची मदत

## डॉ. प्रमोद राजूस्कर यांचे सर्वत्र कौतुक



संगमनेर (प्रतिनिधी):- आधार फाउंडेशनचे शिलेदार डॉ.प्रमोद राजूस्कर यांनी आपल्या ५० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्वतःला भेट मिळालेली सर्व स्टेशनरी त्यात आणखी स्वतः स्टेशनरीची भर घालून आधारच्या शैक्षणिक दत्तक पालक योजनेतील विदयार्थ्यांसाठी ही सर्व स्टेशनरी (वह्या, कंपास,पॅड, पेन्सिल बॉक्स, स्केच पेन बॉक्स, पाणी बॉटल,पेन इ.) आधारला मदत केली.

आजकाल वाढदिवस म्हटले की पार्ट्या, केक, डीजे आणि डामडौल यांवर हजारो रुपयांची उधळपट्टी केली जाते. मात्र, डॉ राजूस्कर यांनी भौतिक सुखांपेक्षा सामाजिक बांधिलकीला प्राधान्य दिले. समाजातील वंचित घटकांसाठी काहीतरी करणे हे आपले कर्तव्य आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. अनाथ किंवा निराधार मुलांना जेव्हा नवीन वह्या आणि पेन मिळतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो. आपल्यालाही समाजात कोणीतरी सांभाळणारे आहे, ही भावना त्यांच्यात निर्माण होते. हा उपक्रम केवळ साहित्याची मदत नाही, तर त्या मुलांच्या स्वप्नांना दिलेली एक नवी भरारी आहे. डॉक्टरांनी राबवलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. रुग्णांची सेवा हीच ईश्वर सेवा मानणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तीने अशा प्रकारे सामाजिक स्तरावरही मदतीचा हात पुढे करणे, हे आजच्या काळातील एक आदर्श उदाहरण आहे. भेट स्वीकारताना आधार फाउंडेशनचे समन्वयक सोमनाथ मदने, नेत्ररोग तज्ज्ञ दीप्ती राजूस्कर व व्यवस्थापक ऋषिकेश शिंदे हे उपस्थित होते.

# अन्न-औषधांच्या तक्रारींसाठी आता डिजिटल सुविधा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या पुढाकारातून नागरिकांना अन्न व औषधांबाबतच्या तक्रारी सहज, जलद आणि पारदर्शक पद्धतीने नोंदविता याव्यात, त्यांचा मागोवा घेता यावा आणि कार्यवाहीची माहिती वेळेवर मिळावी, या उद्देशाने complaints.mahafda.in हे डिजिटल तक्रार पोर्टल सुरू करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मोबाईलद्वारे उपलब्ध सेवा, तक्रार ट्रॅकिंग, अधिकारी डॅशबोर्ड आणि माहितीच्या गोपनीयतेची आधुनिक मानके यांचा समावेश असलेले हे पोर्टल नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक करणारे व्यासपीठ ठरणार आहे. अन्न व औषधांची गुणवत्ता ही सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंधित बाब आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, मुदतबाह्य औषधे, निकृष्ट दर्जाची उत्पादने, अस्वच्छ उत्पादन किंवा साठवण व्यवस्था यांसारख्या बाबींविषयी नागरिकांना सक्षम आणि विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिक कोणत्याही वेळेस मोबाईल किंवा संगणकाद्वारे तक्रार नोंदवू शकतात, तिची सद्यस्थिती पाहू शकतात आणि संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत माहिती त्वरित पोहोचवू शकतात. हे पोर्टल मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. मोबाईल क्रमांकाच्या आधारे नोंदणी करून ओटीपी प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतर नागरिक तक्रार नोंदवू शकतात. तक्रार नोंदविताना संबंधित जिल्हा, दुकान, हॉटेल, औषध विक्रेता, उत्पादक किंवा ब्रँडची माहिती तसेच तक्रारीचे स्वरूप नमूद करता येते. 'स्पीच टू टेक्स्ट' सुविधेमुळे बोलूनही माहिती नोंदविण्याची सोय उपलब्ध आहे. तक्रारीच्या पडताळणीसाठी बिल, छायाचित्रे, उत्पादनाचे तपशील, बॅच क्रमांक किंवा इतर आवश्यक पुरावे जोडता येतात. तक्रार नोंदविताना स्थानाची माहिती देणे अनिवार्य ठेवण्यात आले असून त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करणे सुलभ होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत निळवंडे शाळेतील मुलांचे यश

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या एप्रिल २०२६ मधील पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता चौथी व सातवी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निळवंडे येथील मुलांनी घवघवीत यश मिळवले आहे. शाळेचे मुख्याध्यापक रमेश निघूते यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गशिक्षिका मंदा कडलग - गायकर, तुषार फल्ले, संजय एरंडे व शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी केलेल्या नियोजनाला चांगले यश मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकताच अंतरिम निकाल जाहीर केला असून शाळेतील तब्बल २२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. इयत्ता चौथीच्या वर्गातील पुनम गणेश आहेर (२५०), अक्षरा शाम पवार (२४६), यश नानासाहेब पवार (२४४), गौरी रावसाहेब पवार (२४२), स्वरा राजेंद्र पाचारणे (२२६), स्वरा सुधीर पवार (२२६), काव्या सतीश पवार (२१६), जीवन रोहिदास आहेर (२१४), साईश्वरी सोमनाथ आहेर (२०६), कृष्णा प्रकाश पवार (२०४), श्रेयस दत्तात्रय केरे (१९८), अनन्य विलास पवार (१७८), रुद्र सचिन सोनवणे (१७८), अनुष्का सुदाम उकिरडे (१४०), कैवल्य राजेंद्र केरे (१३८), सानिका संदीप पवार (१२६) तर सातवीच्या वर्गातील अनुज तुषार फल्ले (२५०), गायत्री रामनाथ केरे (२२६), सोहम बाळासाहेब पवार (२२०), प्रिया सतीश भोसले (१६२), आराध्या मुक्ताहरी दवंगे (१६०), पूर्वा दत्तात्रय केरे (१४२) गुण मिळवून परीक्षेत पात्र ठरले आहेत.

शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी प्रत्येक रविवार व शाळेच्या सुट्टीच्या दिवशी जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सातत्य, जिद्द, चिकाटी, मेहनत व सराव या पंचसूत्रीचा वापर करत विद्यार्थ्यांकडून प्रत्येक विषयाचे १५० पेक्षा जास्त पेपर सोडवून घेतले. त्यामुळेच शाळेतील विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, गट शिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, केंद्रप्रमुख आशा घुले, सरपंच शशिकला पवार, उपसरपंच भाऊसाहेब आहेर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवाजी आहेर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर, माजी अध्यक्ष रावसाहेब वारे, पोपटराव पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष उत्तमराव पवार, प्रकाश पवार, शाळेतील शिक्षक कैलास दिघे, अनिल गाडेकर, सौदामिनी सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Nasir Abdulrehman Shaikh
NEW NAME AS
Nasir Abdulraheman Shaikh
ADD - Jamir Fireworks, Bharat Nagar Sangamner 422605 Dist :- Ahilyanaga

**पाहिजेत**
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण- किमान १० वी
पत्ता- पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Shahin Bano Rashid Khan
NEW NAME AS
Shahin Mohammad Hanif Tamboli
ADD - Madina Nagar Sangamner 422605 Dist :- Ahilyanagar

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**तातडीने वॉचमन पाहिजे**
चालू बिल्डिंग साईटसाठी
विश्वासू व जबाबदार वॉचमन पाहिजे
ठिकाण: संगमनेर,
वेळ: सकाळी ८ ते संध्याकाळी ७
- संपर्क -
८८८८१४६६६१

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI - 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727









**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# मॉम-एबल फर्टिलिटी सेंटरमध्ये जनजागृतीचा उपक्रम

संगमनेर - जागतिक आयव्हीएफ दिनानिमित्त संगमनेर येथील मॉम-एबल फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर येथे विशेष जनजागृती कार्यक्रम, वंध्यत्व मार्गदर्शन शिबिर आणि मोफत तपासणी उपक्रम उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील दांपत्यांमध्ये वंध्यत्वाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात तज्ज्ञ डॉक्टर, भ्रूणशास्त्रज्ञ आणि संपूर्ण वैद्यकीय टीम सहभागी झाली होती. कार्यक्रमाची सुरुवात मोफत पती वीर्य तपासणी शिबिराने करण्यात आली. हे शिबिर पुढील आठवडाभर सुरू राहणार असून, वंध्यत्वाचा सामना करणाऱ्या गरजू दांपत्यांसाठी मोफत IVF व Fertility Consultation देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.



यावेळी तज्ज्ञांनी सांगितले की, ग्रामीण भागातही वंध्यत्वाचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, जागरूकतेचा अभाव, योग्य तज्ज्ञांपर्यंत पोहोच न होणे आणि उपचारांबाबत असलेले गैरसमज यामुळे अनेक जोडपी वेळेत उपचार घेत नाहीत. परिणामी उपचारांचा कालावधी वाढून मानसिक व आर्थिक ताणही वाढतो.

फर्टिलिटी सेंटरमध्ये गेल्यानंतर प्रत्येक रुग्णाला IVF उपचारच करावे लागतात, असा अनेकांचा समज चुकीचा असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. योग्य तपासण्या, औषधोपचार, समुपदेशन, आवश्यकतेनुसार लहान शस्त्रक्रिया किंवा IUI यांच्या मदतीने सुमारे ८० टक्के जोडप्यांच्या समस्या दूर होऊ शकतात, तर केवळ २० टक्के रुग्णांनाच IVF उपचारांची आवश्यकता भासते, असे तज्ज्ञांनी सांगितले.

यावेळी मॉम-एबल फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या संस्थापक व फर्टिलिटी स्पेशालिस्ट डॉ. एकता वाबळे यांनी ग्रामीण भागातील दांपत्यांना योग्य वेळी फर्टिलिटी तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन केले. जसे हृदयरोग, मेंदू किंवा मूत्रपिंडाच्या आजारांसाठी संबंधित तज्ज्ञांकडे जाणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे वंध्यत्वाच्या समस्यांसाठीही फर्टिलिटी स्पेशालिस्टकडून उपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी रुबी हॉल क्लिनिक, पुणे तसेच जैोळींश IVF, पुणे येथील आयव्हीएफ तज्ज्ञ डॉ. राजेश बालकृष्ण आणि प्रमुख भ्रूणशास्त्रज्ञ डॉ. रुचिका सूद विशेष उपस्थित होते. डॉ. राजेश बालकृष्ण हे दर महिन्याला नियमितपणे मॉम-एबल सेंटरमध्ये येऊन जटिल आणि आव्हानात्मक IVF रुग्णांवर उपचार करतात. ग्रामीण भागातील दांपत्यांनी मोठ्या शहरांमध्ये धाव घेण्याऐवजी आपल्या शहरातच उपलब्ध असलेल्या आधुनिक आणि तज्ज्ञ सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अत्याधुनिक State-of-the-Art IVF Laboratory,, अनुभवी तज्ज्ञांची टीम, किफायतशीर, पारदर्शक आणि नैतिक उपचारपद्धतीच्या माध्यमातून संगमनेरसारख्या छोट्या शहरात जागतिक दर्जाची फर्टिलिटी सेवा उपलब्ध करून देण्याचा केंद्राचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी डॉ. एकता वाबळे, डॉ. राजेश बालकृष्ण, डॉ. रुचिका सूद, डॉ. संदीप रहाणे, गगन राऊत, सीमा हसे, मोहन आंब्रे, ज्योती आर्गडे, तनुजा, अभिजीत खरात तसेच केंद्रातील सर्व कर्मचारी आणि रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीट गुणांच्या नैराश्यातून विद्यार्थीनीची आत्महत्या



युवावार्ता (प्रतिनिधी)

कर्जत - वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या विद्यार्थिनीने अपेक्षित गुण न मिळाल्याच्या नैराश्यातून आयुष्यच संपवल्याची हृदयद्रावक घटना अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील जलालपूर येथे घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून स्पर्धा परीक्षांतील वाढत्या मानसिक तणावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मृत विद्यार्थिनीचे नाव अंकिता सुरेश सांगळे (वय १९) असे आहे. अंकिताने २१ जून रोजी झालेल्या नीट फेरपरीक्षेला हजेरी लावली होती. या परीक्षेत तिला १६६ गुण मिळाले, तर कट-ऑफ १७७ गुणांचा होता. अपेक्षित यश हुकल्यामुळे ती गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणाव आणि नैराश्यात होती. शुक्रवारी (२५ जुलै) तिचे वडील आणि भाऊ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले होते. घरात आई कामात व्यस्त असताना अंकिता अभ्यासासाठी दिलेल्या स्वतंत्र खोलीत गेली. बराच वेळ ती बाहेर न आल्याने आईने खोलीचा दरवाजा उघडून पाहिले असता, अंकिताने गळफास घेतल्याचे भयावह दृश्य तिच्यासमोर आले. हा प्रकार पाहून आईने एकच आक्रोश केला. शेजाऱ्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, अंकिताने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये नीट फेरपरीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे आपण नैराश्यात गेल्याचा उल्लेख केल्याचे समोर आले आहे. या घटनेने तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

स्पर्धा परीक्षांमधील यश-अपयश हे आयुष्याचे अंतिम मोजमाप नसते. मात्र, वाढता मानसिक ताण, अपेक्षांचे ओझे आणि नैराश्य यामुळे अशा दुर्दैवी घटना घडत असल्याने विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत अधिक संवेदनशील होण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# संगमनेर नगरपरिषदेत संभाव्य पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन व्यवस्थेचा आढावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात व धरण क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूर परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी संगमनेर नगर परिषदेत माननीय नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्य व विभागप्रमुखांची विशेष आढावा बैठक पार पडली. बैठकीस मुख्याधिकारी, उपनगराध्यक्ष, नगरसेवक-नगरसेविका, विविध विभागांचे प्रमुख, आरोग्य, पाणीपुरवठा, अग्निशमन, बांधकाम, विद्युत, स्वच्छता, प्रशासन तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत प्रवरा, म्हाळुंगी, म्हणूटी, नाटकी तसेच शहरातील लहान-मोठ्या ओढे-नाल्यांच्या पाणीपातळीवर सातत्याने लक्ष ठेवणे, धरणातून होणाऱ्या विसर्गाची अद्ययावत माहिती प्राप्त करून त्यानुसार उपाययोजना करणे, पूरप्रवण भागातील नागरिकांना वेळेवर सूचना देणे, आवश्यकतेनुसार स्थलांतराची तयारी ठेवणे तसेच निवारा केंद्रे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीजपुरवठा, आरोग्य सुविधा, औषधसाठा, सर्पदंशावरील औषधे, रुग्णवाहिका, अग्निशमन विभागाचे साहित्य व बचाव पथके सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तसेच शहरातील नाले, गटारे, पंपिंग स्टेशन, जलशुद्धीकरण केंद्र, पाणीपुरवठा यंत्रणा, ड्रिंकिंग वॉटर टँक, आपत्कालीन नियंत्रण कक्ष तसेच पूरग्रस्त भागातील वाहतूक व्यवस्थेवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. आवश्यकतेनुसार पोलीस प्रशासन, महसूल विभाग, आरोग्य विभाग, महाराष्ट्र सुरक्षा बल (चडञ्), स्वयंसेवी संस्था व सामाजिक संघटनांशी समन्वय साधून मदत व बचावकार्य प्रभावीपणे राबविण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले. यावेळी विद्यमान नगरसेविका सौ. रचना भाभी मालपाणी यांनी सामाजिक बांधिलकी जपत संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत स्थलांतरित नागरिकांसह बचाव व मदतकार्यात कार्यरत अधिकारी, कर्मचारी आणि आपत्कालीन पथकांसाठी मालपाणी परिवाराच्या वतीने भोजनाची संपूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी स्वीकारल्याची घोषणा केली. त्यांच्या या समाजहिताच्या निर्णयाचे सभागृहातील सर्व पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका व अधिकाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करत मालपाणी परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन केले.


CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME IS APSANA ISHAK SAYYED

TO NEW NAME AS AFSANA ISHAK SAYYED

UIDAI 512637177993
ADRESS - A/P KURAN, KURAN, SANGAMNER 422605



नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

SMBT BANK

✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन हीच काळाची गरज - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आढळा धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाल्याने नदीपात्रात मुबलक पाणी उपलब्ध झाले असून, त्याचा थेट लाभ शेती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तसेच भूजल पातळी वाढण्यासाठी होणार आहे. या उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केल्यास या परिसरातील शेतकऱ्यांना वर्षभर पाण्याची टंचाई जाणवणार नाही, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.


संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथे आढळा नदीचे जलपूजन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी

जलसंपदा विभाग अभियंता योगेश जोर्वेकर प्रीतम शेवाळे महायुतीचे बापूसाहेब देशमुख, रोहिदास साबळे, हरीश चकोर, संजय कडलग, कैलास आडभाई, मीनानाथ खताळ, रामा जमदाडे, विनोद सुर्वे, श्रीकांत कडलग, पोपट नाईकवाडी, शरद कदम, रोहिदास कडलग, मनोज देशमुख, अरुण देशमुख, दिलीप देशमुख, दत्ता कडलग, वैभव नाईकवाडी, सुरेश लांडगे, संदेश देशमुख, सुशांत कडलग, रवी देशमुख, भाऊसाहेब साळवे, राजेंद्र देशमुख, अशोक देशमुख,आशिष कानवडे

यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, यापूर्वी धरणातील पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन होत नव्हते. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अपेक्षित लाभ शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी मिळत नव्हता. मात्र यंदा राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आढळा, भोजापूर आणि निळवंडे धरणांच्या पाण्याचे जलसंपदा विभागाने प्रभावी नियोजन केले. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा योग्य पद्धतीने वापर शक्य झाला आहे. याच नियोजनामुळे गत उन्हाळ्यात निळवंडे, आढळा आणि भोजापूर धरणांमधून कालव्याद्वारे तब्बल आठ आवर्तने सोडण्यात आली. दुष्काळी परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या पिकांना दिलासा मिळाला. भविष्यातही उपलब्ध जलसंपत्तीचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करणे ही काळाची गरज असल्याचे आमदार खताळ यांनी स्पष्ट केले.आढळा धरणातून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीकाठच्या विहिरी, कूपनलिका आणि जलस्रोतांची पाणीपातळी वाढण्यास मदत होणार आहे.

# आत्महत्यांचा राजीनामा कधी होणार ?

युवकांच्या आंदोलनाचे फलित म्हणून शिक्षण मंत्री प्रधानांचा राजीनामा झाला. या बातम्या पुढचे ४-८ दिवस चालतील. लवकरच या प्रसंगाचा विसरही पडेल पण एक प्रश्न सदैव अनुत्तरित राहिल, तो म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी NEET परीक्षा रद्द झाल्यामुळे आत्महत्या केल्या त्याचे काय ?



आत्महत्या केलेल्या मुलांच्या पालकांना कोट्यावधी रुपये मिळतील पण मुले परत येणार नाहित. अवाजवी अपेक्षांचे ओझे वाहणारे विद्यार्थी NEET/ JEE/ CET लाच सर्वस्व मानतात आणि त्यात अपयश दिसताच टोकाचे निर्णय करतात. हे असे का घडते आहे याचा विचार शिक्षण तज्ज्ञांना करावाच लागेल. अन्यथा अशा असंख्य आत्महत्या घडतच राहतील कुटुंबं उध्वस्त होतच राहतील.

आमच्या शिक्षण व्यवस्थेने शाळेतले खेळ थांबवले. आठवड्यात फक्त २ तासिका खेळासाठी दिल्या. मुलांचा शारीरिक आणि भावनिक विकास थांबवला. हार-जीत दोन्हीत आनंद घेता येतो आणि सहजतेने हार पचवता येते हे खेळातून मिळणारे शिक्षण व्यवस्थेतून सहज हद्दपार केले. संगीत, नृत्य, नाट्य, कला, क्रीडा, वाचन, लेखन अशा छंदांपासून स्पर्धा परीक्षेच्या नावाखाली मुलांना आम्ही दूर केले. एकटे असलो तरी आनंदात वेळ घालवता येतो याचे विस्मरण झाले. समाज माध्यमे वेळ घालवण्याचे साधन बनले. त्यावरची नकारात्मकता सहजच मनात घर करायला लागली. यातून प्रत्यक्ष संवाद हरपू लागला आणि मुले एकाकी होऊ लागली.

गेल्या काही दशकात सरकारी शाळा आणि खाजगी शाळांमधील दरी वाढत गेली. गरीब आणि श्रीमंतांच्या शिक्षणात तफावत निर्माण झाली. १२ वी पेक्षा प्रवेश परीक्षांच्या गुणांना जास्त महत्व प्राप्त झाले. शाळा-कॉलेज पेक्षा क्लासेसचे महत्व वाढले. शिक्षणावरचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला. यातूनच अपेक्षांचे ओझे देखील वाढत गेले.

यातच बाहेरचे जग प्रचंड वेगाने बदलू लागले. बाजारातल्या गरजा बदलल्या. त्या वेगाने आमच्या अभ्यासक्रमात व शिक्षण पद्धतीत बदल झाले नाही. म्हणायला राष्ट्रीय शिक्षण नीति लागू झाली पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक व्यवस्था आणि मनुष्यबळ सरकारने दिले नाही. शिक्षणावरील बजेट सातत्याने कमी होत गेले. यामुळे महाविद्यालयात ५-७ वर्षे घालवूनही नोक-या मात्र मिळेनाशा झाल्या. कौशल्याधिष्ठित शिक्षणाचा तोकडा प्रयत्न झाला पण त्याचीही प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. केंद्रीय नेतृत्वाच्या निर्णयांच्या अंमलबजावणीत सरकारी अनास्था याचे मुख्य कारण बनली. यामुळे बाजारातील कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यात मोठी तफावत झाली. परिणाम युवकांमधील वाढत्या नैराश्यात आणि आत्महत्यात झाला.

जीवन सुंदर आहे, अनमोल आहे, चढ-उतार हे जीवनाचे अविभाज्य अंग आहे, हार-जीत सहजतेने घेता आली पाहिजे, काही वेळा नियती नकार देखील देते ते नकार पचवता आले पाहिजे, आपल्या व्यक्तिमत्वातील सामर्थ्यस्थळे ओळखता आली पाहिजे, त्या मार्गाने पुढे जाण्याचा मोकळेपणा परिवार समाज व व्यवस्थेने द्यायला हवा. हे जोपर्यंत घडणार नाही, त्यासाठी आवश्यक शिक्षण व्यवस्था उभी रहाणार नाही तोपर्यंत आत्महत्या घडत रहातील, आंदोलने उभी होत रहातील, राजीनामे होत रहातील, संधीसाधू यावर देखील आपल्या भाकरी शेकत रहातील, मंत्री - सत्ता बदलतील पण परिस्थिती बदलणार नाही. जेन-जी च्या या विजयानंतर यावर चर्चेची व कार्यवाहीची सुरवात व्हावी व त्यात युवकांचा मोठा सहभाग असावा ही अपेक्षा !!



– डॉ. संजय मालपाणी
शिक्षण तज्ज्ञ, संगमनेर

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# भंडारदरा व निळवंडे धरणे तांत्रिकदृष्ट्या भरले

## प्रवरा नदी दुथडी भरून वाहती, प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा



छाया – विलास तुपे, राजूर



छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात रविवारी दिवसभर मुसळधार पावसाने धुमाकूळ घातल्याने संपूर्ण परिसर जलमय झाला आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे भंडारदरा धरणाचा पाणीसाठा झपाट्याने वाढून ९२.०२ टक्क्यांवर पोहोचला असून, धरणाचा साठा नियंत्रित ठेवण्यासाठी स्पिलवे गेटमधून ७,१७६ क्युसेसने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवरा नदी दुथडी भरून वाहत असून, प्रसिद्ध रंधा धबधबा प्रचंड वेगाने कोसळत असल्याने त्याने अक्राळ-विक्राळ रूप धारण केले आहे.

भंडारदऱ्यातून होणाऱ्या विसर्गामुळे निळवंडे धरणातही मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू असून, या धरणाचा साठा ९४.७७ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी १३,०८५ क्युसेसने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे प्रवरा नदीच्या पात्रात पाण्याचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला असून नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

रविवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे अकोले तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी ओढे-नाले दुथडी भरून वाहू लागले असून, शेतीपिकांना फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. काही ठिकाणी शेतात पाणी साचल्याने खरीप पिकांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच डोंगराळ भागातील रस्त्यांवरून पाणी वाहत असल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. जिल्ह्याची 'चेरापुंजी' म्हणून ओळख असलेल्या घाटघर येथे सर्वाधिक ९२ मिमी पावसाची नोंद झाली. याशिवाय रतनवाडी येथे १२३ मिमी, भंडारदरा येथे ९० मिमी, तर पांजरे येथे ६१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या मुसळधार पावसामुळे परिसरातील धबधबे आणि निसर्गरम्य स्थळे ओसंडून वाहू लागली असून पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. धरणांच्या सुरक्षिततेसाठी आणि पाणीसाठ्यावर सतत लक्ष ठेवण्यासाठी शाखा अभियंता सागर ढोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली वसंत भालेराव, बाळू खाडे, गोविंद बर्थडे, सुरेश हंबीर, चंदर खडके यांच्यासह सर्व कर्मचारी सतत दक्ष आहेत. तसेच रंधा धबधबा आणि अन्य पर्यटनस्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी राजूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पर्यटकांवर बारकाईने नजर ठेवण्यात येत आहे.

# पेपरफुटीवरून संसदेत विरोधक आक्रमक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा (दुरुस्ती) विधेयक सोमवारी लोकसभेत सादर केले. यावेळी आवाजी मतदानाने सादर करण्यासाठी मतदान घेण्यात आले. दरम्यान, विरोधी खासदारांनी 'मोदी-शहा यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी' अशा घोषणा दिल्या. गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. यापूर्वी सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर ५ मिनिटांच्या आतच दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले होते.

दुसरीकडे, माजी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा दिल्यानंतर सोमवारी पहिल्यांदाच संसदेत पोहोचले. एनडीएच्या खासदारांनी त्यांना शाल आणि मिथिला पाग (पगडी) घालून सन्मानित केले आणि संसद भवनाच्या आतपर्यंत घेऊन गेले. प्रधान यांनी नीट पेपरफुटीच्या वादामुळे २५ जुलै रोजी राजीनामा दिला होता. दुसरीकडे, सकाळी १०:३० वाजता विरोधकांनी संसदेच्या मकर गेटवर निदर्शने केली. काँग्रेससह इतर विरोधी पक्ष नीट पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईबाबत सरकारकडून उत्तराची मागणी करत आहेत.

संसदेबाहेरील निदर्शनांचे फोटोसंसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांना सभागृहाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न न करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, सध्या सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे परीक्षा पद्धती अधिक मजबूत करण्यासाठी सुधारणांवर चर्चा करणे आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे असलेले हे महत्त्वाचे विधेयक मंजूर करणे.

# शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

पुणे (वृत्तसंस्था)

राज्यातील सेमी-इंग्रजी अध्यापन पद्धतीच्या शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरताना पात्रतेच्या अटींमध्ये महत्त्वाची शिथिलता देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. इंग्रजी माध्यमातून व्यावसायिक अर्हता पूर्ण केलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास आता बी.ए. (इंग्रजी), एम.ए. (इंग्रजी), बी.एस्सी. आणि एम.एस्सी. पदवीधारक उमेदवारांनाही शिक्षक भरतीसाठी पात्र मानले जाणार आहे. याबाबतचे शुद्धीपत्रक शालेय शिक्षण विभागाने जारी केले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अधिनियम, २००९ तसेच १३ फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शिक्षकांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे अनिवार्य राहणार आहे. सेमी-इंग्रजी शाळांमधील शिक्षकांनाही ही अट पूर्वीप्रमाणेच लागू राहील. शासनाने जारी केलेल्या शुद्धीपत्रकानुसार, इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते दहावी या सर्व गटांसाठी शिक्षकांची निवड करताना संबंधित शाळेचे अध्यापन माध्यम तसेच उमेदवाराने शालान्त परीक्षा कोणत्या माध्यमातून किंवा द्वितीय भाषा विषयासह उत्तीर्ण केली आहे, याचाही विचार केला जाणार आहे. यापूर्वी सेमी-इंग्रजी वर्गांसाठी इंग्रजी माध्यमातून व्यावसायिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवारांनाच प्राधान्य दिले जात होते. मात्र, अनेक सामाजिक प्रवर्गांमध्ये अशा पात्र उमेदवारांचा अभाव असल्याने मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त राहत होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने पात्रतेच्या निकषांमध्ये बदल करत नव्याने जाहिरात देण्यास आणि बी.ए./एम.ए. (इंग्रजी) तसेच बी.एस्सी./एम.एस्सी. पदवीधारक उमेदवारांनाही भरती प्रक्रियेत संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सेमी-इंग्रजी शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्यास मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकांची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे.

# शांततापूर्ण आंदोलन हा घटनात्मक अधिकार

## पोलिसी दडपशाहीला सर्वोच्च न्यायालयाची फटकार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असून तो कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेतला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी व्यक्त केले. केवळ आंदोलन किंवा निदर्शने सुरू आहेत म्हणून पोलिसांकडून होणारी कठोर कारवाई किंवा कथित दडपशाही योग्य ठरवता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.



सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने आंदोलनादरम्यान पोलिसांवर होणारे हल्लेही तितकेच गंभीर असल्याचे नमूद करत, अशा घटनांबाबत सरकारकडून उत्तर मागितले जाऊ शकते, असे सांगितले.

देशभरात शांततापूर्ण आंदोलनासाठी एकसमान नियमावली (प्रोटोकॉल) आणि निश्चित स्थळे असावीत, जेणेकरून नागरिकांना आपले मत शांततेने मांडता येईल आणि उपद्रवी घटकांवर कठोर कारवाई करणेही शक्य होईल, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली. सर्वोच्च न्यायालयात दोन स्वतंत्र याचिकांवर सुनावणी सुरू आहे. या याचिकांमध्ये छएएढ पेपरफुटी प्रकरण आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी कथित अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या याचिका २० जुलै रोजी संसद मार्चदरम्यान घडलेल्या घटनांशी संबंधित आहेत.

कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली २० जुलै रोजी जंतर-मंतर ते संसद असा मोर्चा काढण्यात आला होता. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या कालावधीत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान आंदोलक आणि पोलिसांमध्ये अनेकदा झटापट झाली.

काही आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून संसदेकडे कूच केल्याने परिस्थिती चिघळली. जंतर-मंतर, संसद मार्ग, जनपथ चौक, वॉर मेमोरियल, कर्तव्य पथ आणि विजय चौक मार्गे आंदोलक संसद परिसरापर्यंत पोहोचले. संसदेत घुसण्याचा प्रयत्न झाल्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. उशिरा सायंकाळी दगडफेकीच्या घटनाही समोर आल्या असून, या संपूर्ण संघर्षात १०० हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती आहे.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
30% 70% डिस्काउंट सेल
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jeweller's
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services